**विशेष दिवाणी दावा क्र. ३६१/२०२३**

*CNR No. MHSO060016452023*

अभिजीत सावंजी *वि.* विजय सावंजी वगैरे

**निशाणी क्र. ५१ व ५३ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ तर्फे तिची कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन विना कैफियत आदेश रद्द करण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादीचे कथन आहे की, दिनांक २८.०८.२०२३ पासून ९० दिवसांच्या आता कैफियत देणे आवश्यक होते. तथापि, वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यात वाटघाटी चालू असल्याने कैफियत देण्यास उशीर झालेला आहे. सदरील विलंब जाणिवपुर्वक झालेला नसून, तो माफ करण्यात येऊन प्रतिवादी क्र. २ ची कैफियत स्वीकारण्यात यावी.

०२. वादीतर्फे म्हणणे मांडण्यात आले की, अर्जातील कारण संयुक्तीक नाही. अर्जास विलंब झालेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. असे दिसते की, प्रतिवादी क्र. २ हिस कैफियत देण्यासाठी पुरेसा कालावधी देण्यात आलेला होता. दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. १ ची मुलगी व वादीची बहीण आहे. सबब, दाव्याचे स्वरुप पहाता, खर्च रकमेवर परवानगी देणे योग्य होईल. सबब, खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज रु. १,०००/– चे खर्चावर मंजूर करण्यात येतात.

२. खर्च रक्कम दिल्यावर विना कैफियत आदेश रद्द समजण्यात येऊन कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. खुल्या न्यायालयात घोषीत.

स्वाक्षरी/–

दि. १२.१२.२०२३

( नीलेश सु. बुद्रुक )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,

पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 12/12/2023 |
| Order uploaded on | : | 12/12/2023 |